# नागपूर जिल्ह्यातील २८ रेती घाटांची पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे इतिवृत्त दि.२१.०१.२०२२.

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ नुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी नागपूर, ता. व जि. नागपूर यांनी नागपूर जिल्हयातील एकुण २८ रेतीघाट कन्हान व पेंच नदीवर **सावनेर** तालुक्यातील रायवाडी-अ (३.३७ हेक्टर), वाकोडी (३.५० हेक्टर), रामडोंगरी-ब (४.० हेक्टर), करजघाट (३.५२ हेक्टर), ईसापुर-अ (३.८० हेक्टर), रोहणा (२.१० हेक्टर), बावनगांव-अ (१.९४ हेक्टर), गोसेवाडी-अ (४.२० हेक्टर), बावणगांव-ब (२.७० हेक्टर), **पारशिवनी** तालुक्यातील घाटरोहना (३.० हेक्टर), सिंगारदीप (४.४० हेक्टर),पालोरा (२.० हेक्टर), पिपळा (१.९३ हेक्टर), सिहोरा (४.५० हेक्टर), वाघोडा (४.० हेक्टर), ऐसंबा (१.५७ हेक्टर), गरांडा (३.२० हेक्टर), साहोली-अ (२.५० हेक्टर), साहोली-ब (३.६० हेक्टर), पारडी-क (४.५० हेक्टर), जुनी कामठी (गाडेघाट) (२.०), **कामठी** तालुक्यातील उनगांव (४.८१ हेक्टर), चिकना-अ (२.२५ हेक्टर), नेरीघाट (४.८५ हेक्टर), **मौदा** तालुक्यातील चिकनाघाट (४.८६ हेक्टर), किरणापूर (४.९५ हेक्टर), मोहखेडी (४.९० हेक्टर), **कुही** तालुक्यातील चिचघाट (३.०हेक्टर) रेतीघाटाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी करीता दि. १३.१२.२०२१ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

सदर प्रस्तावानुसार नागपूर जिल्ह्यातील २८प्रस्तावित रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २१.०१.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे श्रीमती. आर. विमला,भाप्रसे जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री.अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य होते व श्री.आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत **(सहपत्र-१)**. सदर लोकसुनावणी ऑनलाईन पध्दतीने वेबेक्स प्लेटफॉर्मवर सुध्दा आयोजीत करण्यात आली असून ऑनलाईन पध्दतीने एकुण १७ नागरीक उपस्थित होते.

## पार्श्वभूमी

मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांनी रेती/वाळू निर्गमीतीचे धोरण दि. ०३.०९.२०१९ अनुसार २८ रेती घाट उत्खननासाठी प्रस्तावित केलेले असुन जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपूर यांना विविध अनुमती घेण्याकरीता प्रकल्प प्रवर्तक म्हणून नेमलेले आहे.

सदर २८ रती घाट तालुकास्तरावर मा.तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या व भूवैज्ञानिक, म.प्र.नि.मंडळ यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका तांत्रिक समितीद्वारे ओपन कास्ट पध्दतीने घमेले, पावडे यांच्या साहाय्याने उत्खनन करण्याचे प्रस्तावित आहे.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

..२/-

सर्वप्रथम मा. जिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २१.१२.२०२१ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण ३ आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले आहे. मंडळाचा आदेश क्र. ई-०३/२०२२ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-220117-FTS-0221 dtd. 17/01/2022 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३).**

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत नागपूर जिल्ह्यातील २८ रेतीघाटाचे सादरीकरण केले. सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-१ यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**सादरीकरणा दरम्यान दिलेली प्रस्तावित उत्खनन पध्दत:-**

१. मातीचे ढिगारा किंवा मातीचे उत्खनन करता येणार नाही.
२. रेती उत्खनन टोपले, पावडे द्वारे मजुरांकडुन करण्याचे प्रस्तावित.
३. उचललेली रेती ट्रॅक्टरद्वारे वाहतुक करण्याचे प्रस्तावित.
४. ट्रॅक्टर वगळता कोणतही अवजड व यांत्रिक मशिनरी उपयोगात आणता येणार नाही.
५. उत्खननाकरीता ठरवून दिलेला कालावधी हा दि. १० जून ते ३० सप्टेंबर पर्यंतचा मानसुन कालावधी वगळता जास्तीत जास्त १ वर्षाकरीता प्रस्तावित आहे.
६. रेती उचलणे किंवा रेती वाहतुकी दरम्यान एकही झाड तोडण्याची परवानगी नाही.
७. एकही रेती घाट हा माननीय राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयानुसार नदी प्रतीबंधित क्षेत्रात प्रस्तावित नाही, असे नमुद आहे.

८. रेतीची क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक होऊ नये म्हणून ट्रॅक्टर ट्रॉली वर आकारमानाचे रंगीत पट्टे रंगविण्यात येतील, असे नमुद आहे

९. तसेच रेती वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉली ला विशिष्ट रंग देण्याचे प्रस्तावित करता येईल, असे नमुद आहे.

लोकसुनावणीच्या अनुषंगाने लेखी मुद्दे / सूचना खालील प्रमाणे नमुद आहे.

कार्यवृत्त :

१. **श्री. उदयसिंग उर्फ गज्जु यादव, पुर्व उपसभापती, पंचायत समिती, रामटेक.**
   - जिल्हा सर्वेक्षण अहवाल सार्वजनिक डोमेनमध्ये उपलब्ध नसल्याने सदर अनिवार्य आवश्यकता प्रशासनाने पुर्ण केली नाही.
   - जिल्हा प्रशासनाने पावसाळ्यापुर्वी व नंतर रेती घाटाचे शास्त्रोक्त सर्वेक्षण करावयास पाहिजे होते आणि सर्व २० रेती घाट खाणीमध्ये वाळूचा पुनर्भरणा अनिवार्य अभ्यास व्हायला हवा होता, जो करण्यात आला नाही.
   - खाण आराखडा तयार करतांना जिल्हा प्रशासनाने खाणपट्टा क्षेत्राचे चार कोपरे आणि सिमा निश्चित केल्या पाहिजेत.

२. **श्री. मिरझा झिया बैग, एम.झेड. इंटरप्राईजेस, नागपूर.**
   - महाराष्ट्र शासनाने दि. २०.१.२०२० च्या कॅबिनेट बैठकीमध्ये वाळू धोरण, २०१९ नाकारली आहे. त्यामुळे रेती घाटाच्या २०२१-२२ च्या लिलावाकरीता सर्व प्रस्ताव/कारवाई निष्फळ ठरते.

३. **श्री. मोहम्मद जुनाईद, जाफरनगर, नागपूर.**
   - जिल्हा सर्वेक्षण अहवाल सार्वजनिक डोमेनमध्ये एक महिन्यापुर्वी प्रशासनाद्वारे उपलब्ध करण्यात आला नाही.
   - कन्हान व पेंच नदीवरील २८ रेतीघाटाचे संबंधित अधिकाऱ्यांकडुन सर्व्हेक्षण करण्यात आलेला नाही व त्याचा अभ्यासही करण्यात आलेला नाही.

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर :**

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, यांनी लेखी आक्षेपांवर खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले.**

- प्रशासनाने एनआयसी च्या संकेतस्थळावर दि. ९.११.२०२१ ते ९.१२.२०२१ पर्यंत सार्वजनिक डोमेनमध्ये रेती घाटाचा अहवाल उपलब्ध करण्यात आले होते. या कालावधीमध्ये कुठल्याही प्रकारचा आक्षेप प्राप्त झाले नाही. तक्रारदार श्री. उदयसिंग यादव हे कार्यालयात आले असता, त्यांच्या तक्रारीचे निराकरून त्यांचे समाधान करण्यात आले.

- रेती घाटाच्या २०२१-२२ च्या लिलावाकरीता मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये २०२२ मध्से नवीन धोरण येणार अशाप्रकारचे मॅसेज व्हॉट्सॲपर आले होते. परंतु यावर अधिकृतपणे शासनाने कुठलाही निर्णय झाला नसुन सूरू असलेले रेती घाटाचे धोरण थांबवा असे शासनाकडुन कळविण्यात आले नाही. त्यामुळे तुर्तास सुरू असलेली रेती घाटाची पर्यावरण विषयक सुनावणी प्रक्रिया थांबविणे शक्य नाही.

..४/-

- पर्यावरण विषयक जनसुनावणी झाल्यानंतर शासनाकडे पुढील मंजुरीकरीता अर्ज सादर करण्यात येईल, असे तक्रारदारास सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-१ ऑनलाईन व प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या लोकांना परत एकदा आपले आक्षेप व अभिप्राय मांडण्याबद्दल आव्हान केले. परंतु ऑनलाईन पध्दतीने एकही मुद्दा उपस्थित झाला नाही.

**मा. जिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्षा लोकसुनावणी समिती.**

यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद करण्यात आली आहे, असे सांगितले व सदर प्रकल्पाला समर्थन देण्याचे आव्हान केले. तसेच उप-प्रादेशिक अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्षा यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **(आर. विमला, भाप्रसे)**<br>**जिल्हाधिकारी, नागपूर व**<br>**अध्यक्षा, लोक सुनावणी समिती**<br>25/11/2022 | **(अशोक करे)**<br>**प्रादेशिक अधिकारी,**<br>**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**<br>**सदस्य, लोक सुनावणी समिती** | **(आनंद काटोले)**<br>**उप-प्रादेशिक अधिकारी,**<br>**म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ व**<br>**समन्वयक, लोक सुनावणी समिती** |

## MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING OF 28 SAND GHATS IN NAGPUR DISTRICT DATED 21.01.2022.

As per Ministry of Environment and Forest, Govt. of India Notification dated 14.09.2006 amended notification dated 1.12.2009. District Mining Office, Collector Office, Nagpur have requested Maharashtra Pollution Control Board to conduct Environmental Public Hearing for 28 Sand Ghats on River Kanhan and Pench in Nagpur District at **Saoner** Taluka Raiwadi-A (3.37 Ha), Wakodi (3.50 Ha.), Ramdongri-B (4.0 Ha.), Karajghat (3.52 Ha.), Isapur-A (3.80 Ha.), Rohana (2.10 Ha.), Bawangaon-A (1.94 Ha.), Gosewadi-A (4.20 Ha.), Bawangaon-B (2.70 Ha.), **Parseoni** Taluka Ghatrohana (3.0 Ha.), Singardeep (4.40 Ha.), Palora (2.0 Ha.), Pipla (1.93 Ha.), Sihora (4.50 Ha.), Waghoda (4.0 Ha.), Yesamba (1.57 Ha.), Garanda (3.20 Ha.), Saholi-A (2.50 Ha.), Saholi-B (3.60 Ha.), Pardi-C (4.50 Ha.), Juni-Kamptee (Gadeghat)-B (2.0 Ha.), **Kamptee** Taluka Ungaon (4.81 Ha.), Chikna-A (2.25 Ha.), Nerighat (4.85 Ha.), **Mouda** Taluka Chiknaghat (4.86 Ha.), Kirnapur (4.95 Ha.), Mohakhedi (4.90 Ha.), **Kuhi** Taluka Chichghat (3.0 Ha.). Received proposal from project proponent dtd. 13.12.2021 for conducting Environmental Public Hearing.

As per proposal, the Environmental Public Hearing in respect of 28 Sand Ghats in Nagpur District under the Chairperson Smt. R. Vimala, IAS District Collector, Nagpur conducted on 21.01.2022. Shri. Ashok Kare, Regional Officer, M.P.C.Board, Nagpur was the member of the public hearing panel and Shri. Anand Katole, Sub-Regional Officer, M.P.C.Board, Nagpur-1 act as a convener. The Public Hearing started at 11.30 pm. with the permission of the Chairperson of the Public Hearing Panel. The public hearing is conducted through online mode also by using webex platform. Total 17 persons have attended the hearing through online mode. Attendance of the People present during the Public Hearing is attached as **Annexure-I.**

**BACKGROUND :**

District Collector, Nagpur intends to auction sand ghats and appointed District Mining Officer, Nagpur as project proponent as per sand mining guidelines dated 03.09.2019. Total 28 sand ghats are identified by Taluka Level Technical Committee chaired by Tahsildar and Dy. Engineer, Irrigation, Junior Geologist, Directorate of Geology and Mining, Junior Geologist G.S.D.A., representative of Maharashtra Pollution Control Board for scooping of sand by manual method.

**PURPOSE AND PROCEDURE:**

With the permission of Chairperson of Public Hearing, the Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-1 has started Public Hearing by welcoming the Chairperson and Member of the public hearing panel, local citizens from the village and others.

The Chairperson of Public Hearing Panel inform the Public Hearing is conducted for recording the views/objects/suggestions of the participants regarding the project, and same is communicated to the Government. She also clarified that this panel is not here to take decision for accordance of any approval to the project and appealed the participants to express their views and suggestion.

..2/-

Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-I explained the purpose of conducting this public hearing that as per MoEF, GOI Notification SO 60(E) of 27th January, 1994 and amended on 14th September, 2006. The notices for the public hearing was published in two local widely circulated news papers i.e. the 'Hitavada' (English) and 'Navrashtra' (Marathi) on 21.12.2021. Copies of the same are enclosed as **Annexure-II.** Copies of the executive summary both in English and in Marathi and other information/documents were made available to the public by making these documents available in various Govt. offices as well as local Gram Panchayat as per MoEF GOI Notification. Suggestions, comments and objections of the public were called in writing till before the date of Public Hearing from the publication of the notice. The public hearing panel was constituted vide MPC Board Office Order E-03/2022 No. BO/JD/(WPC)/PH/B-220117-FTS-0221 dtd. 17.01.2022. Copy of the same is enclosed as **Annexure-III.**

Thereafter, Sub-Regional Officer, Nagpur-I and Convener requested the project proponent to give their detail presentation about the project and the Environmental issues related with it. Accordingly representative of the project proponent gave detailed power point presentation of the project in local language as under:

He has given information regarding project undertake by 28 Sand Ghats in Nagpur District. He further explained regarding project location, project area, sand availability and its benefits to manage the flow of river and flood control.

**Method of Mining explain during presentation:-**

1. Not allowed to remove soil/soil overburden and soil mining.
2. Sand mining should be carried out manually.
3. Allowed sand loading through labour and transportation through tractor only.
4. Period of scooping of sand will be for one year excluding monsoon period of 10th June to 30th September.
5. Tree cutting not allowed during sand mining.
6. Sand mining not allowed in polluted river stretch as per Hon'ble NGT directions.
7. To avoid overloading of sand make a provision of capacity marking.
8. Colour coded vehicle (Tractor) should be use for transportation of sand.

Following objections raised through written submissions during the public hearing.

**<u>PROCEDDINGS</u>** :-

1. **Shri.Udaysingh Gajju Yadav, Farmer Vice President, Panchayat Samiti, Ramtek**
    - District survey report is not available in public domain. This requirement is not full-fill by the Government.
    - District authority should carry survey of the sand ghat before and after monsoon. Also, study of filling the sand is not carried out. This requirement is not full fill by the Government.
    - While preparing report of the sand ghat District Authority should mark the all 4 borders of the sand ghat and finalize boundary of the sand ghat.

2. **Shri. Mirza Zia Baig, M.Z. Enterprises, Nagpur.**
   - It is submitted that, Maharashtra State Government in its Cabinet Meeting held on 20.01.2022 has scrapped sand policy 2019 due to which all the proposals, proceedings and steps being taken by the administration for the auction of the sand ghats for the period 2021-22 has become infructuous.

3. **Shri. Mohd. Junaid, Jafar Nagar, Nagpur.**
   - District authority has not made available the District survey report before one month period in public domain. This requirement is not fulfilled by the Government.

   - Concern officials and agency has not made survey of 28 sand ghat on Kanhan and Pench River. Also, the related study is not carried out.

**<u>District Mining Officer, District Collector, Nagpur</u>:**

**District Mining Officer, Nagpur has given reply on the written objections received.**

- District authority has made available report of the sand ghat NIC website from 9.11.2021 to 9.12.2021 in public domain.

- In year 2022 new sand policy will launch for the auction of the sand ghats in cabinet meeting, such type of WhatsApp messages has been received on the mobile phone. But Government has not taken any decision on new sand policy. Also, Government has not informed to stop the running sand ghat policy. Therefore, it is not possible to stop the process of carrying public hearing of the sand ghat.

- Also, I informed to complainant that, the public hearing minutes will be forwarded to the Government for further approval.

**District Collector Nagpur & Chairperson of Public Hearing Panel.**

Smt. R. Vimala, District Collector & Chairperson of public hearing panel. Summarized the questions and queries raised by the people present for public hearing and replies given by project proponent and informed that the issues raised by the people noted in the proceeding of hearing and requested participants to support the sand mining projects. Sub-Regional Officer, MPCB, Nagpur extended vote of thanks to the present public and public hearing concluded with a vote of thanks to the chair.

| | | |
|---|---|---|
| **(R. Vimala, IAS)**<br>**District Collector,**<br>**Nagpur & Chairperson of the Public Hearing Panel**<br>25/1/22 | **(Ashok Kare)**<br>**Regional Officer,**<br>**MPC Board, Nagpur & Member of the Public Hearing Panel** | **(Anand Katole)**<br>**Sub-Regional Officer,**<br>**MPC Board, Nagpur-1 & Convener of the Public Hearing Panel** |

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी नागपूर, ता. व जि. नागपूर यांनी नागपूर जिल्हयातील एकुण २८ रेतीघाट कन्हान व पेंच नदीवर सावनेर तालुक्यातील रायवाडी-अ (३.३७ हेक्टर), वाकोडी (३.५० हेक्टर), रामडोंगरी-ब (४.० हेक्टर), करजघाट (३.५२ हेक्टर), ईसापुर-अ (३.८० हेक्टर), रोहणा (२.१० हेक्टर), बावनगांव-अ (१.९४ हेक्टर), गोसेवाडी-अ (४.२० हेक्टर), बावणगांव-ब (२.७० हेक्टर), पारशिवनी तालुक्यातील घाटरोहना (३.० हेक्टर), सिंगारदीप (४.४० हेक्टर),पालोरा (२.० हेक्टर), पिपळा (१.९३ हेक्टर), सिहोरा (४.५० हेक्टर), वाघोडा (४.० हेक्टर), ऐसंबा (१.५७ हेक्टर), गरांडा (३.२० हेक्टर), साहोली-अ (२.५० हेक्टर), साहोली-ब (३.६० हेक्टर), पारडी-क (४.५० हेक्टर), जुनी कामठी (गाडेघाट) (२.०), कामठी तालुक्यातील उनगांव (४.८१ हेक्टर), चिकना-अ (२.२५ हेक्टर), नेरीघाट (४.८५ हेक्टर), मौदा तालुक्यातील चिकनाघाट (४.८६ हेक्टर), किरणापूर (४.९५ हेक्टर), मोहखेडी (४.९० हेक्टर), कुही तालुक्यातील चिचघाट (३.०हेक्टर) रेतीघाटाच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रस्तावित आहे. वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांची अधिसूचना दि. १४.९.२००६ व दि. ०१.१२.२००९ च्या सुधारीत अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत.

**दिनांक : २१.०१.२०२२**
**वेळ : सकाळी ११.३० वाजेपासून**
**स्थळ : बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.**
**वेबेक्स ॲप मिटींग आयडी: २५१६-१५०-९६०४**
**पासवर्ड : २१०१२०२२**

| अ. क्र. | उपस्थितांचे नाव | हुद्दा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती. आर. विमला<br>जिल्हाधिकारी, नागपूर. | अध्यक्षा | [signature] 21/1/2022 |
| २. | श्री. अशोक मा. करे<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर. | सदस्य | [signature] 21/01/2022 |
| ३. | श्री. आनंद नि. काटोले<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१. | समन्वयक | [signature] |
| ४. | श्री. शिरिष पांडे<br>अप्पर जिल्हाधिकारी<br>नागपूर. | | [signature] |

PAGE NO.:
DATE.: / / 20

5. Dr. Gajanan Kamde
DMO Nagpur

[signature] 27.01.22

6.

PAGE NO.:
DATE.: / / 20

| अ. क्र. | उपस्थितांचे नांव | गावाचे नांव | सही |
| --- | --- | --- | --- |
| १. | Sanjay gaikwad | Nagpur | [signature] |
| २. | Avinash Dhoke | Nagpur | [signature] |
| ३. | Hiten Sanghvi Photographer | Nagpur | [signature] |
| ४. | R. R. Thombare A. DMO | Nagpur | [signature] |
| ५. | Sushil Meshram open Arch | Mumbai (Vashi) | [signature] |
| ६. | Changdeo Tiwari | Nagpur | [signature] |
| ७. | | | |
| ८. | | | |
| ९. | | | |
| १० | | | |
| ११ | | | |
| १२ | | | |
| १३ | | | |
| १४ | | | |
| १५ | | | |
| १६ | | | |